# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती-४४४ ६०४
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

" Towords Global Technological Excellence "

दु.क्र (०७२१)२५३१९२९/३०

फॅक्स- (०७२१)

वेबसाईट www.gcoea.ac.in

ई मेल : principal@gcoea.ac.in


सुचना

जा.क्र.शाअमअ/२२/शि.वि/ 3430
दिनांक :- 07/09/2022

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज** www.scholarship.gov.in **या वेबपोर्टलवर ऑनलाईन भरुन सादर करणेबाबत**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ला या महाविद्यालयामध्ये प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांकरिता **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज** www.scholarship.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन रित्या भरुन सादरकरण्याची प्रक्रिया चालु झालेली आहे. विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी तात्काळ खालील नमुद पात्रतेनुसार www.scholarship.gov.in या वेबपोर्टलवर **दिनांक ३१/१०/२०२२ पुर्वि ऑनलाईन रित्या अर्ज सादर करावा व त्याची हार्ड कॉपी शिष्यवृत्ती विभाग, शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे सादर करावी.**

जे विद्यार्थी शिष्यवृत्ती सवलतीचा अर्ज योग्य त्या कागदपत्रांसह व विहित मुदतीत सादर करणार नाही. असे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहिल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. अधिक माहिती करिता www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | शिष्यवृत्तीची पात्रता | शिष्यवृत्ती रक्कम | अर्ज करण्याची शेवटची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | प्रगती शिष्यवृत्ती योजना | १.मुलींकरिता फक्त<br>२.वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असावे | रु. ५०,०००/- प्रति वर्ष | दि. ३१/ऑक्टोंबर /२०२२ |
| २ | सक्षम शिष्यवृत्ती योजना | १.विषेश दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता (दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा जास्त असावे.)<br>२.वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असावे | रु. ५०,०००/- प्रति वर्ष | दि. ३१/ऑक्टोंबर /२०२२ |
| ३ | स्वनाथ शिष्यवृत्ती योजना | १.अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई वडिल दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ ने मृत्यु पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रिय निमलष्करी दलाच्या कार्यवाहीमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता स्वनाथ शिष्यवृत्ती योजना आहे. | रु. ५०,०००/- प्रति वर्ष | दि. ३१/ऑक्टोंबर /२०२२ |

**शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याविषयी महत्वाच्या सुचना :-**

१. विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या (Mahadbt Portal) या दोन पैकी कोणत्याही एका शिष्यवृत्ती करिता अर्ज सादर करावा.
२. SC, ST, OBC, VJ/NT, SBC या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी शुल्कामध्ये सवलत घेवून प्रवेश घेतला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या (Mahadbt Portal) वर शिष्यवृत्तीचा अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.
३. खुल्या प्रवर्गा जास्तीत जास्त विद्यार्थीनींनी आपल्या पात्रतेनुसार वर नमुद प्रगती शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
अमरावती

प्रत :- विभाग प्रमुख १.स्थापत्य विभाग. २. संगणक विभाग, ३. विद्युत विभाग ४. अणविद्युत विभाग ५. माहिती व तंत्रज्ञान विभाग, ६. उपकरणी विभाग, ७. यंत्रअभियांत्रिकी विभाग. ८. पदार्थ विज्ञान विभाग ९. रसायनशास्त्र विभाग १०. गणित विभाग ११. ग्रंथालय, विभागामधील सर्व वर्गामध्ये परिभ्रमणाकरीता तसेच प्रत्येक पात्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्याकरिता १२. सर्व वस्तीगृह (मुलींचे व मुलांचे) १३. सुचना फलक, मुख्य इमारत, शा. अभियांत्रिकी महाविद्यालय , अमरावती १४. डाटा सेंटर, शा. अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती. महाविद्यालयाच्या वेबसाईट वर अपलोड करण्याकरिता